## निशाणी क्र. २६ वरील आदेश

प्रतिवादी क्रमांक १ यांनी प्रस्तुतचा अर्ज कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादीतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादींना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी युक्तीवाद सादर केला नाही.

३. प्रस्तुतचा दावा वादीने अधिकार घोषणा व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादीला कैफियत देण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना अशी संधी दिल्यास दाव्याचा निकाल गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना अशी संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना कैफियत देण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यांना कैफियत देण्याची संधी दिल्यास वादीचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. त्यामुळे त्यांना कैफियत देण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते.

४. प्रस्तुत प्रतिवादीला दिनांक ०२/०९/२०२१ रोजी समन्सची बजावणी झाली आहे. त्यानी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १६/०३/२०२२ रोजी दिला

आहे. प्रतिवादीविरुद्ध कैफियत नाहीचा आदेश दिनांक ०८/१२/२०२१ रोजी झाला आहे. प्रस्तुत प्रतिवादीला कैफियत देण्यास ५ महिने १४ दिवसांचा विलंब झालेला आहे. सबब, विलंबाचे प्रमाण पाहता प्रस्तुत प्रतिवादींनी खर्चाची रक्कम देण्याबाबत आदेश पारित करणे आवश्यक वाटते. परिणामी, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रतिवादीने पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम रुपये ५००/– (रु. पाचशे फक्त) जमा करावी, त्यापैकी रुपये २५०/– (रु. दोनशे पन्नास फक्त) वादीला देण्यात यावेत व उर्वरित रक्कम शासनास जमा करण्यात यावी.

३. प्रतिवादीने वरील पुर्तता केल्यानंतर त्यांच्या विरुद्ध झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येवून त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो व त्यांची कैफियत स्विकारणेत येते.

GIRISH SUDARSHAN MANE
Digitally signed by GIRISH SUDARSHAN MANE
Date: 2023.03.08 17:15:54 +0530

स्थळ : कोरेगाव
दिनांक ०६/०३/२०२३

( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.